# M/P ENT - 16

Total No. of Pages : 8

| Seat No. | |
|---|---|

## M.Phil./Ph.D. Entrance Examination, July - 2022
## MARATHI

**Day and Date : Saturday, 16 - 07 - 2022** **Total Marks : 100**
**Time : 11.00 a.m. to 1.00 p.m.**

**Instructions :**
1) **All questions are compulsory.**
2) **Each question carries 2 marks.**
3) **Answers should be marked in the given OMR answer sheet by darkening the appropriate option.**
4) **Use black ball point pen only for marking the circle. Do not make any stray mark on the OMR Answer Sheet.**
5) **Follow the instructions given on OMR Sheet.**
6) **Rough work shall be done on the sheet provided at the end of question paper.**
7) **Only non-programmable calculators are allowed.**

1) व्यापक स्वरूपाचा व्यक्तिगत अथवा सामुदायिक अभ्यासाचा दीर्घकालीन संदर्भशोध, क्षेत्रीय सर्वेक्षणावर आधारलेला तपशीलवार अभ्यासाला काय म्हणतात?

A) संशोधन प्रकल्प B) शोधनिबंध
C) प्रबंध D) व्याप्तीलेख

2) संशोधनास अनुरूप अशी अभ्यासपद्धती स्वीकारताना प्रथम काय स्पष्ट करणे गरजेचे असते.

A) माहिती B) सैद्धांतिक चौकट
C) संदर्भग्रंथ सूची D) तक्ता

3) साहित्यशास्त्रातील 'तृष्णेचे काव्यशास्त्र' हा म.सु. पाटलांचा लेख संशोधनाच्या कोणत्या आकृतिबंधात मोडतो?

A) व्याप्तीलेख B) शोधनिबंध
C) लघुप्रबंध D) विवेचक ग्रंथ

4) लेखकाचे नाव, ''अवतरणात लेखाचे नाव'', मासिकाचे नाव अधोरेखित, अंक क्र. (वर्ष): पृष्ठ क्र.–या पद्धतीने संदर्भ देण्याची पद्धत कोणती?

A) APA/Harvards B) MLA style
C) Chikago Manual of style D) ASA

*P.T.O.*

5) संशोधन क्षेत्रातील समस्येशी संबंधित आशय, सिद्धान्त, आकडेवारी, व्याख्या, मतमतांतरे यांच्या संदर्भात आधीच्या अभ्यासकांच्या योगदानाचा चिकित्सक परामर्ष म्हणजे?

A) पूर्वाभ्यासाचा आढावा
B) पुनर्संशोधन
C) स्रोतांची चाचपणी
D) गृहितकांचा आढावा

6) इतिहासातील निरनिराळ्या कालखंडाचा अभ्यास करताना त्या काळात घडणाऱ्या विविध घटनांमागचे समान सूत्र शोधण्याला महत्त्व द्यावे, अशी भूमिका कोणी घेतली आहे?

A) क्रोंचे
B) कांट
C) अंतोनियो ग्रामी
D) स्पेंगलर

7) ऐतिहासिक संशोधनपद्धतीत हेगेलने कोणता सिद्धान्त मांडला?

A) द्वंद्वात्मक विकासाचा सिद्धांत
B) संस्कृती विनाशाचा सिद्धांत
C) सामान्यांच्या इतिहासाचा
D) प्रबोधनात्मक इतिहाचा सिद्धांत

8) साहित्याचा इतिहास म्हणजे साहित्यातील रूपबंधांच्या स्वायत्त विकासाचा इतिहास हे सूत्र कोणी मांडले?

A) कार्ल मार्क्स
B) कॉलिंगवूड
C) क्रोंचे
D) आर. एस. क्रेन

9) पद्धतीशास्त्राचा जनक कोण?

A) एडवर्द सैद
B) निकोलस गार्नहॅम
C) एडमंड हुसेर्ल
D) सिमान द बोव्हा

10) 'महाराष्ट्र सारस्वत' ह्या वि.ल. भावे यांच्या ग्रंथास पुरवणी लेखन कोणी केले आहे.

A) शं. गो. तुळपुळे
B) वि. दि. काळे
C) गं. बा. सरदार
D) बा. रं. सुंटणकर

11) एकाच साधनाचा संदर्भ जेव्हा लागोपाठ येतो, तेव्हा तो संदर्भ नोंदवताना कोणता शब्द योजावा आणि पुष्ठक्रमांक द्यावा.

A) ग्रंथनाम
B) तत्रैव
C) संदर्भ
D) टीप

12) अर्थ निर्मितीची प्रक्रिया चक्राकार असल्याचा सिद्धांत कोणी मांडला?

A) तेन
B) हेगेल
C) फ्रेडरिक श्लायमाखर
D) अॅडम स्मीथ

13) व्यवहारिक हेतूने केलेल्या संशोधनाचा पाया कोणता असतो.

A) सामाजिक उपयुक्तता B) पद बढती

C) महागडा D) समीक्षणात्मक

14) कशात अज्ञात तत्त्वांचा शोध आणि त्यांचे पुनर्मूल्यांकन ह्या दोन्ही प्रक्रियांना महत्त्व असते.

A) शोधात B) सर्वेक्षणात

C) संशोधनात D) संकलनात

15) शोधन (search) आणि संशोधन (Research) या संकल्पनांमध्ये कोणते अर्थ अपेक्षित आहेत?

A) अज्ञाताचा शोध आणि तत्त्वांचे पूनर्मूल्यांकन B) वाचन आणि चिंतन

C) विवेचनात्मक संवर्धन D) यापैकी नाही

16) भूतकाळातील साम्रगीचे केवळ संकलन म्हणजे संशोधन नसून त्याचे विवेचनात्मक संवर्धन (आणि विशिष्ट निष्कर्ष–प्राप्ती) महत्त्वाचे असते, असे मत कोणी व्यक्त केले?

A) क्लाईव्ह बेल B) हर्चिन

C) हिपोलीन तेन D) स्पेंगलर

17) प्रबंध–प्रकाशनाद्वारे होणारे अर्थलाभ, व्यवसायातील स्थिरता, वेतनवाढीची शक्यता यासारख्या उद्दिष्टांनी केलेले प्रबंधलेखन कसे असू शकते.

A) विकृतिजन्य B) मूलभूत

C) ज्ञानशाखेच्या अभिवृद्धीसाठी पुरक D) अधिक प्रभावशाली

18) 'संशोधन म्हणजे जुन्याचा शोध' असा रूढार्थ झाला आहे, असे मत कोणी मांडले?

A) वसंत जोशी B) व. दि. कुलकर्णी

C) सुधा जोशी D) उषा हस्तक

19) सामाजिकशास्त्राच्या संशोधनाची प्रयोगभूमी / प्रयोगशाळा काय आहे?

A) ऐतिहासिक स्थळे व दस्तावेज B) ग्रंथालय

C) पुरातन वस्तुसंग्रहालय D) समाज व समाजातील विविध संस्था

20) प्रत्येक विद्यापीठाच्या भाषा व वाङ्मय विभागात एक सुपरवायझर्स बोर्ड (निर्देशक परिषद) स्थापण्यात यावे आणि त्यास 'आखिल भारतीय निर्देशक परिषदेशी' संलग्न करण्यात यावे, असे मत कोणी मांडले?

A) डॉ. रामचंद्र तिवारी B) स. गं. मालशे

C) शं. बा. जोशी D) वसंत दावतार

21) संशोधनपद्धतीविषयीचा 'साहित्य संशोधन आणि समीक्षा' हा लेख समाजप्रबोधन पत्रिकेच्या अंकात कोणी लिहिला आहे?

A) दु. का. संत
B) शरद साठे
C) मिलिंद मालशे
D) शं. ग. दाते

22) शब्दशः भाषांतर, आशयानुगामी भाषांतर आणि अनुकृतिरूप भाषांतर असे अनुवादाच्या कामाचे तीन प्रकार कोणी कल्पिले?

A) ड्रायडन
B) कान्ट इमॅन्युअल
C) कूपर लेन
D) आर्नल्ड मॅथ्यू

23) 'द न्यू क्रिटिसिझम' या ग्रंथाचे ग्रंथकार कोण.

A) रॅन्सम
B) एलियट
C) रा भा पाटणकर
D) रिजर्डस

24) लोकसाहित्याभ्यासातील 'कार्यान्वयी' या अभ्यासपद्धतीचा खरा प्रणेता कोण?

A) मारीया लीच
B) जेकब ग्रीन
C) बॉनिस्लो मॅलिनॉस्की
D) मॅक्सम्युलर

25) लोकसाहित्यातील अवशेषांना 'सजिवाषेश' असे कोणी संबोधले आहे.

A) तारा भवाळकर
B) दुर्गा भागवत
C) रा. चि. ढेरे
D) प्रभाकर मांडे

26) 'मराठी भाषेची घटना' हा ग्रंथ कोणी लिहिला?

A) मु. श्री. रानडे
B) रा. भि. जोशी
C) कल्याण काळे
D) स. ग. मालशे

27) माधव आचवल यांनी कलाकृतीचे किती अंगे सांगितलेली आहेत.

A) चार
B) तीन
C) सहा
D) सात

28) संहिता चिकित्सेला पाठचिकित्सा हा पर्याय कोणी दिला?

A) न. चिं. केळकर
B) अ. का. प्रियोळकर
C) सदा कऱ्हाडे
D) यापैकी नाही

29) गोव्यातील जानपदगीते कोणी प्रसिद्ध केली आहेत?

A) अ. का. प्रियोळकर
B) वि. स. सुखटणकर
C) बा. भ. बोरकर
D) भालचंद्र नेमाडे

30) संत तुकारामांच्या गाथेचा शैलीवैज्ञानिक अभ्यास कोणी केला आहे?

A) दिलीप धोंडगे
B) रमेश धोंगडे
C) कल्याण काळे
D) अशोक केळकर

31) ब्लुमफिल्ड यांच्या Language या ग्रंथास कोणत्या अभ्यास पद्धतीची प्रत्यक्ष सनद असे म्हटले जाते?

A) ऐतिहासिक
B) तौलनिक
C) समाजविज्ञान
D) वर्णनात्मक

32) छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा लिहिताना महात्मा फुले यांनी कोणाच्या ग्रंथाचा आधार घेतला आहे.

A) ग्रॅंट डफ
B) अबे कॅरे
C) बाबा पद्मंजी
D) जयराम पंडे

33) 'लोचनटीका' हा ग्रंथ कोणाचा आहे?

A) अभिनवगुप्त
B) वामन
C) रुद्रट
D) भामह

34) ॲरिस्टॉटलने कलाकृतीच्या आटोपशीरपणाबरोबर कशाचा आग्रह धरलेला आहे?

A) स्वयंपूर्णता
B) सेंद्रिय एकात्मता
C) अपरिहार्यता
D) संभवनियता

35) 'टीका म्हणजे वाङ्मयासंबंधीचे वाङ्मय होय', अशी समीक्षेची व्याख्या कोणी केली आहे?

A) प्रा. रा. ग. जाधव
B) डॉ. रा. शं. वाळिंबे
C) प्रा. श्री. के. क्षीरसागर
D) डॉ. यशवंत मनोहर

36) 'धुव्र अख्यान' या चरित्रग्रंथाचे कर्ते कोण?

A) शरद पाटील
B) उद्धव चिद्घन
C) मोहन शेळके
D) चि. वि. वैद्य

37) भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न निबंधाचे कर्ते कोण?

A) वि. रा. शिंदे
B) गंगाधर पानतावणे
C) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
D) महात्मा फुले

38) आधुनिक काळात मानसशास्त्राच्या अंगाने रससिद्धांताची मांडणी कोणी केली?

A) र. प. कंगले
B) के. ना. वाटवे
C) ग. त्र्यं. देशपांडे
D) स. रा. गाडगीळ

39) डोळ्याने दिसणाऱ्या समोरच्या वस्तुपेक्षा अधिक मोठ्या चमत्कारिक सुंदर गोष्टीची कल्पना ही कल्पना शक्ती करू शकते, असे कोणी म्हटले आहे?

A) ॲरिस्टॉटल
B) ऑडर्सन
C) मॅथ्यू अर्नोल्ड
D) प्लेटो

40) 'तीन मेंदूचा सिद्धांत' कोणी मांडला आहे.

A) प्रभाकर पाध्ये
B) रा. भा. पाटणकर
C) न. चिं. केळकर
D) गॉसन

41) 'तत्त्वज्ञानातील समस्या' या बर्ट्रांड रसेल यांच्या ग्रंथाचे मराठीत भाषांतर कोणी केले?

A) रा. भा. पाटणकर
B) मे. पुं. रेगे
C) भा. ल. भोळे
D) दि. पु. चित्रे

42) म. सु. पाटलांच्या कोणत्या ग्रंथात काव्यात्म अनुभवाची विस्ताराने तात्त्विक चर्चा करण्यात आली आहे?

A) सर्जनप्रेरणा आणि कवित्वशोध
B) बदलते कविसंवेदन
C) समीक्षामीमांसा
D) कलाकृती आणि समीक्षा

43) 'जगण्याच्या पसाऱ्यात' या कवितासंग्रहाचे लेखन कोणी केले आहे?

A) कवी सौमित्र
B) प्रफुल्ल शिलेदार
C) सतीश काळसेकर
D) निरजा

44) 'वाङ्मयीन निरिक्षणे' या ग्रंथाचे कर्ते कोण?

A) माधव आचवल
B) दत्तात्रय पुंडे
C) कुसुमावती देशपांडे
D) अंजली सोमन

45) 'तक्ता' ही कविता कोणी लिहिली आहे?

A) इंदिरा संत
B) अरूण कोलटकर
C) ग्रेस
D) अनिल

46) वि. का. राजवाडे समर्थ वाग्देवता मंदिर कोठे आहे?

A) वाई
B) सासवड
C) धुळे
D) पुणे

47) 'अमृताचा पुतळा' ही कोणाच्या जीवावर बेतलेली कादंबरी आहे.

A) संत तुकाराम
B) संत ज्ञानेश्वर
C) संत नामदेव
D) संत एकनाथ

48) 'शक्तिसौष्ठव' या ग्रंथाचे कर्ते कोण?

A) द. ग. गोडसे
B) म. ना. अदवंत
C) मिलिंद मालशे
D) स. रा. गाडगीळ

49) 'समीक्षक भालचंद्र नेमाडे' या ग्रंथाचे लेखन कोणी केले आहे?

A) सुधीर रसाळ
B) अशोक बाबर
C) गो. मा. पवार
D) विलास सारंग

50) बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे, असे मत कोणी मांडले?

A) ना. गो. कालेलकर
B) श्री. न. गजेंद्रगडकर
C) वि. का. राजवाडे
D) मो. के. दामले

⌘⌘⌘

रफ कार्य